**राज्यातील अशासकीय अनुदानित व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी वरील व्याज प्रदानांची रु. ५४,६०.५५ लाख इतकी रक्कम पुस्तकी समायोजित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक व्हीओसी-२०२३/प्र.क्र.१३९/कौशल्य-२**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १८ मार्च, २०२६

**वाचा :** १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. व्हीओसी-२००९/(२२३/०९) व्यशि -४, दिनांक २६/०५/२०१०.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. व्हीओसी-२००९/(२२०/०९) व्यशि -४, दिनांक २३/०२/२०११.

३) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग शासन निर्णय क्र. अर्थसं २४११/२०१५/प्र.क्र. १३०/व्यशि-२, दिनांक १५/०२/२०१८.

४) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण सचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. २०४९- भ.नि.नि. व्याज/२०२५-२६/प्र.क्र. २१/कार्या-१५/२५, दिनांक १०/०३/२०२६.

**प्रस्तावना :**

संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम, +२ स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम राबविणाऱ्या अशासकीय अनुदानित तंत्र माध्यमिक शाळा/केंद्रे व कनिष्ठ महाविद्यालयांमधील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची वेतन देयके व भविष्य निर्वाह निधीची रक्कम आहरीत करणे, उचल करणे व अंतिम प्रदान करणे इत्यादीबाबतची कार्यपध्दती संदर्भ क्र. (१) येथील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक २६/०५/२०१० च्या शासन निर्णयान्वये निर्धारित केलेली आहे. त्यानुसार राज्यातील अशासकीय अनुदानित व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संस्थांतर्गत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सन २०२५-२६ या कालावधीत भविष्य निर्वाह निधीवरील जमा होणाऱ्या रकमेवरील व्याजाचे पुस्तकी समायोजन करण्यास मान्यता देण्याची विनंती संदर्भ क्र.(४) येथील संचालनालयाच्या दि. १०/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित संस्थातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधीवरील व्याज लेखाशिर्ष २०४९ २५८७ अंतर्गत (४५) व्याज सन २०२५-२६ या कालावधीकरीता रु. ५४,६०.५५ लाख इतक्या रकमेस पुस्तकी समायोजन करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील अशासकीय अनुदानित व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संस्थामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या भविष्य निर्वाह निधीवरील व्याज प्रदानासाठी सन २०२५-२६ या कालावधीकरीता रु. ५४,६०.५५

लाख (अक्षरी रूपये चोपन्न कोटी साठ लाख पंच्चावन्न हजार फक्त) इतका निधी अर्थसंकल्पीत केलेला असून सदर निधी महालेखापाल, मुंबई / नागपूर, महाराष्ट्र यांचेकडे पुस्तकी समायोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **प्रादेशिक कार्यालयाचे नाव** | **रू. लाखात** | **महालेखापाल कार्यालय** |
|---|---|---|---|
| १ | मुंबई | रु. ८,६१.८० | महालेखापाल कार्यालय, मुंबई. |
| २ | पुणे | रू. १५,०१.६० | |
| ३ | नाशिक | रू. ०९,०६.७७ | |
| ४ | छ. संभाजीनगर | रू. ०५,४१.४२ | महालेखापाल कार्यालय, नागपूर. |
| ५ | अमरावती | रू. ०७,२२.७२ | |
| ६ | नागपूर | रू. ०९,२६.२४ | |
| | **एकूण** | **रू. ५४,६०.५५** | |

२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी तसेच सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय यांनी उपरोक्त व्याजाच्या रकमेचे समायोजन करून अभिलेखांकित करण्याची व नोंद घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

३. राज्यातील अशासकीय अनुदानित व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संस्थामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील भविष्य निर्वाह निधीवरील व्याज प्रदानासाठी रु. ५४,६०.५५ लाख (अक्षरी रूपये चोपन्न कोटी साठ लाख पंच्चावन्न हजार फक्त) इतकी रक्कम खाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावी.

"मागणी क्रमांक झेडए-०१, २०४९, व्याज प्रदाने, ०३, अल्पबचत, भविष्यनिर्वाह निधी इत्यादींवरील व्याज, १०४, राज्य भविष्यनिर्वाह निधीवरील व्याज (००), (००) (०१) अनुदानित अशासकीय व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संस्थांच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी भविष्य निर्वाह निधीवरील व्याज (अनिवार्य) (२०४९ २५८७) अंतर्गत ४५, व्याज"

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०३१८१७३७१९९९०३ असा आहे. हा आदेश डिजीटल साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRINIVAS JAGANNATH SHASTRI

Digitally signed by SHRINIVAS JAGANNATH SHASTRI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=562C9A4A27312E1DE46DBBD470C2F1A3E466D159BC4C9BD7F2F9CC64766ABCE2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C02F19AC7E7AB3A50D817C95CF483E33229CF0CBB03283B175900630F81D2337, cn=SHRINIVAS JAGANNATH SHASTRI
Date: 2026.03.18 17:38:19 +05'30'

**(श्रीनिवास शास्त्री)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.

४. सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, (संचालनालयामार्फत)

५. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई

६. महालेखापाल (लेखा परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.

७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, (संचालनालयामार्फत)

८. कार्यासन अधिकारी (प्रशा-३), कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.

९. निवड नस्ती (कौशल्य-२)